**नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र**
**पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.**

# प्रेस नोट

**दिनांक ०५/०८/२०२२ (शुक्रवार)**

**(दुपार)**

---

## अपघातात मृत्यु

१).पो.स्टे. बोरी :— अंतर्गत ०१ कि. मी. अंतरावरील बुटीबोरी शनी मंदीर, समोर येथे दिनांक ०३/०८/२०२२ चे १७.३० वा. सुमारास फिर्यादींचा भासा नामे— संकल्प संजय वानखेडे व त्याची आई नामे सौ. कल्पना संजय वानखेडे वय ४२ वर्ष, रा. हनुमान वार्ड, हिंगणघाट जि. वर्धा हे दोघेही एमएच—३२/एजी—०१२० क्रमांकाच्या मोटरसायकलने हिंगणघाट येथुन नागपुर येथे बहीणीच्या घरी जात असता शनी मंदीर जवळ एक लाल रंगाची एसटी बसचा चालकाने त्याच्या ताब्यातील गाडी भरभाव वेगाने निष्काळजीपणे चालवुन मोटरसायकला ओवरटेक करून कट मारल्याने दोघेही मोटरसायकलसह खाली पडले. या अपघातात सौ. कल्पना वानखेडे हि एसटीच्या मागच्या चाकात आली व तिचे डोक्याला जबर मार लागुन जागीच मरण पावली. आरोपी एसटी चालक बस घेवुन पसार झाला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे— रवींद्र चुडीरामजी सुर्यवंशी, वय ५० वर्ष, रा. न्यु इंदोरा बारा खोली लाईन नं ०५ जि. नागपुर यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. बोरी येथे आरोपी चालकाविरुध्द कलम २७९, ३०४ (अ) भादवी सहकलम १३४, १८४ मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि श्री पालीवाल मो.क्र. ९९२१३३७२८८ हे करीत आहे.

२) पो.स्टे. देवलापार :— अंतर्गत १२ कि. मी. अंतरावरील मौजा मोरफाटा शिवार येथे दिनांक ०३/०८/२०२२ चे २१.३० वा. ते २२.०० वा. सुमारास MH-14/DF-0842 चा गाडीचा चालक आरोपी नामे— प्रतीक सुर्यप्रकाशसिंग बैस वय २९ वर्ष रा. धंतोली याने त्याचे ताब्यातील कार गोपालगंज मध्यप्रदेश वरून एकटाच नागपुर कडे जात असता कारवरील ताबा सुटल्याने नॅशनल हायवे क्रमांक एमएच ४४ रोड मोरफाटा जवळील पुलावर नागपुर कडे जाणाऱ्या ट्रक क्रमांक TN-88/B-4377 ला मागुण जोरदार धडक दिली. त्यामुळे ट्रकच्या मागे कार घुसल्याने कार क्रमांक MH-14/DF-0842 चा चालक प्रतीक सुर्यप्रकाशसिंग बैस हा भरधाव वेगाने व निष्काळजीपणे स्वताचे ताब्यातील वाहन चालवुन स्वताचे मरणास कारणीभुत ठरला.

सदर प्रकरणी सरतर्फे पोलिस नाईक प्रमोद मडावी पो स्टे. देवलापार यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. देवलापार येथे आरोपी चालकाविरुध्द कलम २७९, ३०४ (अ) भादवी सहकलम १८४ मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास मपोउपनी घेडके मो.क्र. ८१७७९०७००४ या करीत आहे.

**३) पो.स्टे. कळमेश्वर** :— अंतर्गत ०५ कि. मी. अंतरावरील मौजा कळमेश्वर ते नागपुर रोडवर फेटरी येथिल पेट्रोलपंप जवळ येथे दिनांक २९/०७/२०२२ चे १३.०० वा. सुमारास आकाश हिरालाल शाहु (मृतक), वय २८ वर्ष, रा. नागपुर व त्याच्या सोबत फिर्यादी व त्याचे मित्र उद्देश पकीड़े, अक्षय गायकवाड, हितेश भिमटे असे मिळून एमएच— ४९/एआर— ७४६३ क्रमांकाच्या ऑटोमध्ये बसुन यातील ऑटोचालक आरोपी नामे— सचिन धनराज गजभिये वय ३१ वर्ष रा. गड्डीगोदाम सुंदरबाग नागपुर याने आपला ऑटो वेगाने व निष्काळजीपणे चालविल्याने ऑटो पलटी झाला. या अपघातात आकाश हिरालाल शाहु हा जखमी होवुन मेयो हॉस्पीटल येथे दि. ३०/०७/२२ चे १३. ४५ वा. मरण पावला. तसेच त्याचे सोबतचे फिर्यादी व उद्देश पकीडे हे किरकोळ जखमी झाले. दिनांक ३१/०७/२०२२ रोजी मर्ग क्र. ६०/२२ कलम १७४ जाफौ दाखल असल्याने सदर गुन्हा नोंद.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे— मंगेश संजय गायकवाड, वय ३१ वर्ष रा. रिब्लीकन नगर १२ खोलीचे आत नागपुर यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. कळमेश्वर येथे आरोपी चालकाविरुध्द कलम २७९, ३३७, ३३८, ३०४ (अ) भादवी सहकलम १८४ मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास परी पोउपनि टिपले मो.नं. ९९६०७५७१७४ हे करीत आहे.

**४) पो.स्टे. उमरेड** :— अंतर्गत ०७ कि. मी. अंतरावरील मौजा उदासा शिवार येथे दिनांक ०४/०८/२०२२ चे ०८. ५० वा. ते ०९.०० वा. सुमारास अरूण महादेव तितरमारे (मृतक), वय ५३ वर्ष रा. नेहरू नगर प्लॉट नं. ६०४ सक्करदरा चौक नागपुर हे त्यांच्या एम.एच— ४९/एक्स— ६४१५ क्रमांकाच्या मोटरसायकलने नागपुर वरून उमरेडकडे जात असतांना नागपुर मार्ग उमरेड कडे येणारे बुलेरो पिकअप वाहन क्र. एम.एच—४०/एन—५२६४ चा चालक आरोपीने त्याचे ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन मोटरसायकला धडक दिली. या अपघातात अरूण तितरमारे यांचा मृत्यु झाला.

सदर प्रकरणी सरतर्फ पोलिस हवालदार आनंद धात्रक पो. स्टे उमरेड यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. उमरेड येथे आरोपी चालकाविरुध्द कलम २७९, ३०४ (अ) भादवी कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि श्री राजु डोर्लीकर मो.नं. ७५८८२३७७६४ हे करीत आहे.

## अकस्मात मृत्यू

**पो.स्टे. रामटेक** :— अंतर्गत ०७ कि. मी. अंतरावरील मौजा मनसर तलाव येथे दि. ०३/०८/२०२२ चे १६.०० ते दि. ०४/०८/२०२२ चे ०७.०० वा. सुमारास **पंकज अरूण बागडे(मृतक), वय ३२ वर्ष रा.मनसर** हा दारू पिण्याच्य सवईचा असल्याने तो आपल्या आईला मच्छी पकडण्यास जातो म्हणुन घरून निघुन गेला. त्याचा शोध घेतला असता घराजवळील तलावामध्ये त्याचे प्रेत पाण्यात बुडुन मिळुन आले.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे— शिवराज नत्थुंजी बागडे, वय ४२ वर्ष रा. वार्ड क्र ३ मनसर यांचे रिपोर्टवरुन पो. स्टे. रामटेक येथे कलम १७४ जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोलिस हवालदार उकेबोंद्र हे करीत आहे.

## नैसर्गिक विज पडुन मृत्यू

१) पो.स्टे. कन्हान :– अंतर्गत १० कि. मी. अंतरावरील सलवा रोडवर शेती येथे दि. ०४/०८/२०२२ चे १६.३० वा. सुमारास फिर्यादीची पत्नी **सौ नंदाबाई रामकृष्ण खंडाते (मृतक) वय ४४ वर्ष, रा. निलज खंडाळा** ही शेतमजुरीच्या कामाला गेली असता अचानक पाउस सुरू झाल्याने व नैसर्गिक विज तिच्या अंगावर पडल्याने तसेच तिच्या सोबत काम करत असणारी रेखा चौघरी ही जागीच बेशुद्ध पडली. त्यांना वानखेडे हॉस्पीटल कन्हान येथे उपचार कामी नेले असता सौ नंदाबाई खंडाते हिला डॉक्टरांनी तपासुन मृत घोशित केले व सोबत काम करत असणारी रेखा चौघरी हिचे उपचार सुरू आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– रामकृष्ण दामाजी खंडाते, वय ४४ वर्ष रा. निलज खंडाळा यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. कन्हान येथे कलम १७४ जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोलिस हवालदार खुशाल रामटेके मो.नं. ८४८५८६१४४२ हे करीत आहे.

२) पो.स्टे. कन्हान :– अंतर्गत १० कि. मी. अंतरावरील बोरडा टोल नाका येथे दि. ०४/०८/२०२२ चे १८.३४ वा. सुमारास फिर्यादी व त्यांचा लहान भाउ नामे– राघेलाल भिमराव डहारे वय २५ वर्ष, रा. बोरडा यांच्या ठेक्याने घेतलेले शेतीमध्ये पेरणी करण्यास गेले असता अचानक विज राघेलाल भिमराव डहारे याचे अंगावर पडली. त्यांना पीएचसी कन्हान येथे उपचार करण्यास नेले असता डॉक्टरांनी तपासुन मृत घोशित केले.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– बाबुलाल भिमराव डहारे वय ३६ वर्ष, रा. आजनी बोरडा टोल नाका यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. कन्हान येथे कलम १७४ जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोलिस हवालदार खुशाल रामटेके मो.नं. ८४८५८६१४४२ हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर